# वटेमोड महाराज जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**नांदेड/प्रतिनिधी**

येथील गोदावरी शिक्षण संस्था जुना कौठा या सेवाभावी संस्थेच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा धर्मभूषण वटेमोड महाराज जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

धर्मभुषण वटेमोड महाराज जीवन गौरव पुरस्काराचे यंदाचे मानकरी ह.भ.प.श्री संत तनपुरे महाराज, चारोधाम मंडप ट्रस्ट श्री क्षेत्र पंढरपूरचे अध्यक्ष तथा समाज प्रबोधनकर ह.भ.प.श्री बद्रीनाथ महाराज तनपुरे, पूर्व शिक्षण संचालक तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. गोविंद नांदेडे, योग विद्याधाम नांदेडचे सचिव एम.डी.नल्लवार आणि देगलूर महाविद्यालयाचे उपाध्यक्ष नारायण मैलागिरे हे ठरले आहेत.

सद्गुरु धर्मभूषण वटेमोड महराज यांच्या स्मरणार्थ गोदावरी शिक्षण संस्थेच्यावतीने सामाजिक, शैक्षणिक, आध्यामिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, साहित्य क्रीडा, कला व योग साधना आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुरस्कार देण्यात येतो.

शाल, श्रीफळ, पुष्पहार, सन्मानचिन्ह, मानपत्र व ग्रंथभेट असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण लवकरच होणार आहे, असे गोदावरी संस्थेचे सचिव राजेश मठमवार यांनी कळविले आहे.

Scanned with CamScanner